- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, १ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २३३ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,४८,७०० /-
- २३ कॅरेट : १,४६,३५० /-
- चांदी : २,३८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# कोहिनूर इमारत दुर्घटनेत १० ठार

## भिवंडीतील घटना, एकाच गावातील ४ जणांचा दुर्दैवी अंत, दोन सख्ख्या भावांचा समावेश

**वृत्तसंस्था, बीड**

भिवंडीतील कोहिनूर इमारत दुर्घटनेत १० निष्पाप नागरिकांना आपला जीव गमावावा लागला. त्यामध्ये, उत्तर प्रदेशातील एकाच गावातील ४ जणांचा दुर्दैवी अंत झाला असून त्यामध्ये दोन सख्ख्या भावांचा समावेश आहे. एकाच गावातील आणि नातलग असलेल्या चारही जणांचे मृतदेह आता त्यांच्या उत्तर प्रदेशातील मूळ गावी न्यायचे आहेत. मात्र, पीडित कुटुंबांचे घरातील कर्तेच गेल्यामुळे आता मृतदेह देण्यासाठीही त्यांच्याकडे पैसे नाहीत, अशी मन हेलावणरी ही सत्यस्थिती आहे. याचप्रमाणे या दुर्घटनेत कित्येक कथा आहेत, ज्यांमुळे डोळे पाणावल्याशिवाय राहणार नाहीत. जणू कुणाचं मरणच तिथं लिहिलं होतं की काय, असंही इथं पाहायला मिळाल. तर, जीव वाचविण्याच्या आकांताने उडी टाकलेल्या दोघांचा जीव वाचला. मात्र, त्यांना आपले पाय गमवावे लागले आहेत.



भिवंडी दुर्घटनेत पत्नीला औषध देऊन खाली गेले अन् पण पुन्हा घरी आलेच नाहीत, अशी ह्रदयद्रावक घटना समोर आली आहे. भिवंडी शहरातील गंगारामवाडी परिसरात रणजीत सिंह कोहिनूर अपार्टमेंट अ विंग मध्ये तिसऱ्या मजल्यावर राहत असून कोहिनूर बी विंग इमारतीचे पिलर दुरुस्तीचे काम सुरू होते. मात्र, अचानक इमारतीच्या खाली आरडाओरडा सुरू झाल्याने रणजीत सिंह आपल्या आजारी पत्नीला औषध देऊन तू १० मिनिट थांब मी खाली बघून येतो असे म्हणत इमारतीच्या खाली गेला आणि तो पुन्हा परतलाच नाही. इमारत कोसळल्याची बातमी पत्नीला मिळाल्यानंतर पत्नीचे रडून हाल झाले आहेत. पत्नीची फक्त एकच मागणी आहे माझ्या पतीला पुन्हा माझ्याजवळ द्या, त्यांच्या शिवाय माझा कोणीच नाही, अशी मन हेलावणारी घटना इथं घडली.

गंगाराम वाडी परिसरात कोहिनूर अपार्टमेंट ए विंगमध्ये दोन प्लेट असलेल्या संतोष पांडे इमारत धोकादायक नोटीस लागल्यापासून मागील दोन ते तीन दिवसांपासून ते इमारतीत राहत नव्हते. त्याऐवजी ते आपल्या व्यवसाय करत असलेल्या हॉटेलमध्येच झोपायचे. परंतु, आज इमारतीत नक्की काय काम चाललंय, कसं काम चाललंय हे पाहण्यासाठी ते इमारतीच्या खाली आले होते. त्या ठिकाणी पाहणी करत असतानाच अचानक संपूर्ण इमारत कोसळली आणि त्यात संतोष पांडे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

संतोष पांडे यांच्या काकांनी शासनाकडे मागणी केली आहे की, अशा प्रकारच्या दुर्घटना वारंवार होत आहेत. त्यामुळे शासनाने अजून कडक पावले उचलली पाहिजे. जेणेकरून अशा प्रकारच्या दुर्घटना घडणार नाहीत.

### ढिगाऱ्यातून आई आणि पिल्लाची सुखरूप सुटका

गंगाराम वाडी परिसरातील कोहिनूर इमारत कोसळली आणि तब्बल नऊ जणांचा मृत्यू झाला तर तीन जण जखमी अवस्थेत रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्यातच, ढिगाऱ्याखालून एनडीआरएफ टीम आणि टीडीआरएफचे टीम यांनी बचाव कार्य सुरू केल्यानंतर एक कुत्री आणि तिचा पिल्लू ढिगाऱ्यात अडकलेल्या पिल्लूला आणि तिच्या आईला जिवंत बाहेर काढण्यात आलं. त्यानंतर या कुत्रीच्या पिल्लूला एका टबमध्ये ठेवण्यात आलं आणि तिची आई आपल्या पिल्लाच्या अवतीभवती फिरत होती. त्यानंतर आईने आपल्या पिल्लाला जवळ घेतलं आणि तिला घेऊन निघून गेली. मात्र, प्रशासनाने त्यांच्यावर उपचारासाठी काहीही केलं नाही.

### पाय मोडला, पण जीव वाचला

कोहिनूर इमारतीच्या ए विंगमध्ये दुरुस्तीचे काम सुरू होतं आणि अचानक जोरदार आवाज आला. त्यामुळे, पहिल्या मजल्यावर असलेले अभय यादव , दिपक यादव आपल्या फ्लॅटमधून घाबरून बाहेर पडले, बघतात तर काय संपूर्ण इमारत कोसळली आहे.

पळून जाण्यासाठी दुसरा पर्याय मार्ग नाही, कारण संपूर्ण जिना कोसळला होता. त्यामुळे अजय आणि दीपक यांनी थेट पहिल्या मजल्यावरून उडी मारली व आपले जीव वाचवले, त्यानंतर अनेकांना शिडी लावून उतरवण्यात आले. यावेळी मनात फार भीती निर्माण झाली होती आणि जीव कसा वाचवावा असा विचार मनात येत होता. त्यामुळे पहिल्या मजल्यावरून उडी मारली व पाय मोडले पण जीव वाचला, असे त्यांनी म्हटलं. सध्या दोघा तरुणांवरती भिवंडीतील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

थोडक्यात

## अमेरिकेत नोकरीसाठी द्यावे लागणार ९६ लाख?

**वॉशिंग्टन** : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे प्रशासन अमेरिकेत शिक्षण पूर्ण करणाऱ्या विदेशी विद्यार्थ्यांसाठी मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आली. एका अहवालानुसार, अमेरिकेतील विद्यापीठांतून पदवी पूर्ण केल्यानंतर तेथे नोकरी करण्यासाठी विदेशी विद्यार्थ्यांना एक लाख डॉलर म्हणजेच जवळपास ९६ लाख शुल्क भरावे लागू शकते. या प्रस्तावाची चर्चा सुरू होताच सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या असून अनेकांनी या कल्पनेला विरोध दर्शवला आहे.

वॉल स्ट्रीट जर्नलच्या अहवालानुसार, ट्रम्प प्रशासन ऑप्शनल प्रॅक्टिकल ट्रेनिंग योजनेशी संबंधित शुल्क आकारण्याचा विचार करत आहे. मात्र, या संदर्भात अमेरिकन प्रशासनाकडून अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. ऑप्शनल प्रॅक्टिकल ट्रेनिंग ही अशी योजना आहे, ज्याअंतर्गत अमेरिकेतील विद्यापीठातून शिक्षण पूर्ण केलेले विदेशी विद्यार्थी त्यांच्या अभ्यासक्रमानुसार कमाल तीन वर्षे अमेरिकेत काम करू शकतात. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या विशेषतः तंत्रज्ञान आणि वित्तीय क्षेत्रातील विदेशी विद्यार्थ्यांना प्रथम ऑप्शनल प्रॅक्टिकल ट्रेनिंग अंतर्गत नोकरी देतात आणि त्यानंतर त्यांच्यासाठी एच-१बी व्हिसा मिळवून देतात. अहवालानुसार, २०२४ मध्ये सुमारे ४.१९ लाख विदेशी विद्यार्थी ऑप्शनल प्रॅक्टिकल ट्रेनिंग योजनेअंतर्गत अमेरिकेत काम करत होते. त्यामुळे ही योजना अमेरिकेतील कंपन्यांसाठी कुशल आणि प्रतिभावान कर्मचाऱ्यांची महत्त्वाची स्रोत मानली जाते.

# ई-२० पेट्रोलमुळे कोणत्या वाहनांचे नुकसान?, गडकरींची लेखी माहिती




**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

ई-२० पेट्रोल वापरल्याने वाहनांचे नुकसान होऊ शकते. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी राज्यसभेत लेखी उत्तरात ही माहिती दिली. त्यामुळे सरकारने प्रथमच कबुली दिली आहे. गडकरी यांनी सांगितले की, ई-२० मुळे काही जुन्या बीएस-३ वाहनांमधील विशिष्ट रबरचे भाग आणि गॅस्केट बदलण्याची आवश्यकता भासू शकते. ही वाहने प्रामुख्याने २००५ ते २०१६ दरम्यान तयार करण्यात आली होती.

हे भाग नियमित सर्व्हिसिंग दरम्यान सहजपणे बदलता येतात. गडकरी यांनी सांगितले की, अभ्यासात असे आढळून आले आहे की ई-२० मुळे वाहनांच्या एकूण कार्यक्षमतेवर किंवा टिकाऊपणावर कोणताही मोठा परिणाम होत नाही. त्यांनी पुढे सांगितले की, या वाहनांच्या इंजिनमध्ये कोणत्याही बदलांची आवश्यकता नाही. गडकरी यांनी असे विधान करण्याची ही पहिलीच वेळ आहे.

### मायलेज केवळ इंधनावर अवलंबून नसते

गडकरी यांनी स्पष्ट केले की, इंडियन ऑइल, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोलियम, सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्स आणि ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया यांनी दुचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी ई-२० इंधनावर एक अभ्यास केला होता. गडकरी यांनी असेही सांगितले की, वाहनाचे मायलेज केवळ इंधनावर अवलंबून नसते, तर त्यावर ड्रायव्हिंगची शैली, रस्त्याची स्थिती, देखभाल आणि इतर घटकांचाही प्रभाव पडतो. याचा वापर जगभरात शंभर वर्षांहून अधिक काळापासून केला जात आहे.

# नेपाळमध्ये हिंसाचार उफाळला

**वृत्तसंस्था, काठमांडू**

नेपाळमधील कोशी प्रांतातील सुनसरी जिल्ह्यापासून सुरू झालेला जातीय हिंसाचार आता अत्यंत गंभीर वळणावर पोहोचला आहे. सुनसरीतील देवानगंज येथे दोन धार्मिक समुदायांमध्ये झालेली चकमक आता मधेश प्रांतातील सिरहा, धनुषा, पर्सा, सप्तरी आणि बीरगंज या जिल्ह्यांपर्यंत पसरली आहे. या हिंसक चकमकींमध्ये आतापर्यंत ३ जणांचा मृत्यू झाला असून अनेक सुरक्षारक्षकांसह अनेक नागरिक गंभीर जखमी झाले आहेत.



परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून नेपाळ प्रशासनाने बाधित भागांत अनिश्चित काळासाठी संचारबंदी लागू केली असून नेपाळ पोलिस, सशस्त्र पोलिस दल आणि नेपाळ लष्कराला हायअलर्टवर ठेवले आहे. गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिसांनी हवेत गोळीबार आणि अश्रूधुराचा वापर केला. या गोळीबारात ओमप्रकाश मेहता या तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर जखमी झालेला जयप्रकाश मेहता याने उपचारादरम्यान दम तोडला. यानंतर ही हिंसेची लाट सिरहाच्या गोलबाजारमध्ये पोहोचली, जिथे १५ वर्षीय गणेश यादव या तरुणाचा गोळी लागून मृत्यू झाला. या भीषण हिंसाचारानंतर नेपाळमधील बालेन शाह सरकारवर तीव्र टीका होत आहे.

वेळेवर राजकीय आणि प्रशासकीय पावले न उचलल्यामुळेच ही हिंसा ६ शहरांमध्ये पसरल्याचा आरोप माजी पंतप्रधान पुष्पकमल दहाल आणि मानवाधिकार कार्यकर्त्यांनी केला आहे. तणाव वाढल्यानंतर पंतप्रधान बालेन शाह यांनी देशाला संबोधित करत शांततेचे आणि जातीय सलोख्याचे आवाहन केले असून, घटनेच्या निष्पक्ष तपासासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत.

देवानगंज ग्रामीण नगरपालिकेने पोलिस गोळीबारात मारल्या गेलेल्या स्थानिकांना स्थानिक पातळीवर शहीद घोषित केले असून नेपाळ सरकारकडे अधिकृत हुतात्मा दर्जा व १०-१० लाख रुपयांच्या मदतीची शिफारस केली आहे.

### सीमेवरील जिल्ह्यांत कडक बंदोबस्त

भारत-नेपाळ सीमेला (विशेषतः बिहार राज्याला) लागून असलेले सुनसरी, पर्सा, धनुषा आणि सिरहा हे जिल्हे व्यापारी दृष्टीने संवेदनशील मानले जातात. जनकपूरधम, गोलबाजार, लहान, बीरगंज, राजविराज आणि बोदे बर्साइन या संवेदनशील भागांमध्ये नागरिकांच्या हालचालींवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. कर्फ्यू आणि मुख्य रस्ते बंद असल्यामुळे सार्वजनिक वाहतूक विस्कळीत झाली आहे. भारत-नेपाळ सीमा मार्गांवर अत्यंत कडक सुरक्षा तैनात करण्यात आली आहे.

# अमरावतीत विद्यापीठ आणि इंजिनिअरींग कॉलेजचे कँटीन सील

**दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती**

राज्यात एफडीए विभागाच्या कारवाईचा धडाका सुरू असून मुंबई उच्च न्यायालयाने एफडीए विभागाला सुनावल्यानंतर आता सरकारी आस्थापनांवर कारवाईला सुरुवात झाली आहे. विशेष म्हणजे, आजच मुंबईतील मंत्रालयाच्या कँटीनची तुकाराम मुंढेंच्या अधिका-यांनी तपासणी केली. त्यानंतर, विधिमंडळातील कँटीनची देखील तपासणी करण्यात आली आहे.

दुसरीकडे आता आयुक्त तुकाराम मुंढेंच्या आदेशानुसार एफडीने आपला मोर्चा विद्यापीठांकडे वळवल्याचे दिसून येत आहे. अमरावतीमधील संत




गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात आज एफडीएने धाड टाकत कारवाई केली आहे. विद्यापीठ आणि येतील अभियांत्रिकी विद्यालायच्या मुख्य कॅन्टीनमध्ये एफडीने तपासणीसाठी धाड टाकली असता, उपहार गृहात प्रचंड अस्वच्छता आणि अधिकृत परवानाशिवाय हे उपहा गृह सुरू असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर, येथील कँटीन सील करण्यात आले आहे. अन्न औषध प्रशासनाचे सुरक्षा अधिकारी गजानन गोरे यांनी ही कारवाई केली. अमरावती विद्यापीठाची कँटीन आणि शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाची कँटीन पूर्णपणे बेकादेयशीर आणि विनापरवाना असल्याने तातडीची कारवाई करत दोन्ही उपहार गृहांना विभागाकडून टाळे ठोकण्यात आले आहेत.

दरम्यान, या कँटीनमधील अस्वच्छता आणि विनापरवानाच्या अनुषंगाने कारवाईबाबत अन्न व औषध प्रशासनाचे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव आणि शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाला एफडीएकडून पत्र पाठवण्यात आले आहे.

# अमेरिका-इराण युद्धात आतापर्यंत १६ भारतीयांचा मृत्यू

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष अद्यापही सुरू आहे. चर्चेच्या फेऱ्या होऊनही वाटाघाटींमध्ये यश येताना दिसत नाही. अमेरिका आणि इराण दोन्ही देश एकमेकांच्या ठिकाणांवर भीषण हल्ले करतच आहेत. जगाला याचा फटका बसत आहे. अशातच या युद्धात आतापर्यंत किती भारतीयांना जीव गमवावा लागला, याबाबत सरकारने संसदेत माहिती दिली. अमेरिका आणि इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यसभेत प्रश्न विचारण्यात आला होता.

अमेरिका-इराण यांच्यात संघर्ष सुरू झाल्यापासून या प्रदेशात १० खलाशांसह १६ भारतीयांचा मृत्यू झाला आहे. तर ७५ जण जखमी झाले आहेत. एका वेगळ्या घटनेत कतारमधील रास लाफान गॅस प्रकल्पात १२ भारतीयांचा मृत्यू झाला. सरकारने संबंधित देशांच्या सरकारांच्या समन्वयाने, मृत भारतीयांचे पार्थिव लवकर मायदेशी परत आणण्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांना सर्वतोपरी मदत केली. जखमी भारतीयांवर स्थानिक रुग्णालयांमध्ये उपचार करण्यात आले, अशी माहिती परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी दिली.

मध्य पूर्वेतील सुरू असलेल्या संघषार्मुळे ठार झालेले, जखमी झालेले, अडकलेले किंवा बाहेर काढण्यात आलेले भारतीय खलाशी आणि इतर भारतीयांच्या संख्येबद्दल सीपीआय(एम) खासदार जॉन ब्रिटास यांनी राज्यसभेत प्रश्न विचारला होता.

दरम्यान, सरकारच्या अंदाजानुसार इराणमध्ये शाळांमधील विद्यार्थी, वैद्यकीय विद्यार्थी, कामगार, खलाशी आणि मच्छीमार यांच्यासह सुमारे ७ हजार भारतीय नागरिक असू शकतात. संघषार्मुळे भारतात परतावे लागलेल्या, इराणमध्ये शिक्षण घेत असलेल्या भारतीय वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या समस्या सरकारने इराणी अधिका-यांसमोर मांडल्या असून, परिस्थिती सुधारण्याच्या उपायांवर विचार करत आहे असेही त्यांनी सांगितले.

### १० लाख रुपयांची सानुग्रह भरपाई दिली जाते

भारतीय दूतावास आणि वाणिज्य दूतावास, स्थानिक अधिकारी आणि रुग्णालयांच्या सहकार्याने परिस्थितीवर नियमितपणे लक्ष ठेवण्यात आले आहे. कुटुंबियांशी संपर्क साधणे, उपलब्ध प्रवासाच्या पयार्यांची माहिती देणे आणि भारतात सुरक्षित परत येण्याची सोय करणे यासह सर्व आवश्यक मदत पुरवल्या जात आहेत. युद्धक्षेत्रातील घटनांशी संबंधित सर्व प्रकरणांमध्ये, डीजीएमए कल्याण योजनेअंतर्गत (खलाशी कल्याण निधी संस्था - एसडब्ल्यूएफएस) १० लाख रुपयांची सानुग्रह भरपाई दिली जाते. आवश्यक तपास आणि पडताळणीनंतर, सरकार ही रक्कम बाधित खलाशांच्या कुटुंबियांना तात्काळ वितरित करते, अशी माहिती राज्यसभेत देण्यात आली.

### २,५५७ भारतीयांना मायदेशात परतण्यास मदत

सौदी अरेबियात १, कुवेतमध्ये २, ओमानमध्ये ८, इराकमध्ये १, यूएईत ४ भारतीयांचा मृत्यू झाला आहे. तर, यूएईत ३२, ओमानमध्ये २४, कतार येथे ४, कुवेतमध्ये १३, सौदी अरेबियात १ आणि इस्त्रायल येथे १ भारतीय नागरिक जखमी झाला आहे.

एका वेगळ्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री कीर्ती वर्धन सिंह म्हणाले की, फेब्रुवारी २०२६ मध्ये मध्य पूवेर्तील तणाव सुरू झाल्यापासून, तेहरानमधील भारतीय दूतावासाने २,५५७ भारतीय नागरिकांना इराणमधून आर्मेनिया/ अझरबैजानमार्गे भारतात परत आणण्यासाठी मदत केली आहे.

संपादकीय लेखणीतून...

# शहांची हकालपट्टी करा

दिल्लीतील आंदोलनात विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस अत्याचारावरून काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी बुधवारी आक्रमक झाले. पंतप्रधान मोदी यांनी गृहमंत्री अमित शहा यांची तातडीने हकालपट्टी करावी आणि या संपूर्ण प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली उच्चस्तरीय चौकशी करावी अशा मागण्या त्यांनी केल्या. संसदेबाहेर पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनी आरोप केला की, त्यांना लोकसभेत बोलू दिले जात नाही. २० जुलै रोजी संसदेवरील मोर्चावर सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईचा संदर्भ देत राहुल गांधी म्हणाले, गृहमंत्र्यांनीच विद्यार्थ्यांवर पेलेट गन झाडण्याचे आणि खिळे लावलेल्या लाठ्यांनी मारहाण करण्याचे आदेश दिले असावेत किंवा त्यांना या प्रकाराची कोणतीही माहिती नसावी. जर त्यांनी आदेश दिले असतील तर ते या अत्याचारासाठी जबाबदार आहेत आणि जर त्यांना माहिती नसेल तर ते अकार्यक्षम आहेत. पेपरफुटीविरोधी विधेयकावरील चर्चेदरम्यान लोकसभेत राहुल गांधी यांच्या भाषणाच्या वेळी मोठा गदारोळ झाला. गृहमंत्री लोकसभेत उपस्थित नाहीत कारण ते घाबरले आहेत, असा आरोप त्यांनी केला. या वक्तव्याला सत्ताधारी खासदारांनी तीव्र आक्षेप घेतला. गृहमंत्र्यांनीच पोलिसांच्या कारवाईला परवानगी दिली होती, असे राहुल गांधी यांनी म्हणताच सभापती ओम बिर्ला यांनी तातडीने हस्तक्षेप करत स्पष्ट केले की, आजची चर्चा गृहमंत्र्यांवर केंद्रित नाही.

राहुल गांधींनी आपल्या आरोपाच्या समर्थनार्थ पुरावे सादर करावेत असे निर्देशही त्यांनी दिले. दरम्यान, संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी राहुल गांधी यांच्या वक्तव्यावर तीव्र आक्षेप घेतला आणि त्यांच्या माफीची मागणी केली. तुम्ही कोणत्या आधारावर हे वक्तव्य करत आहात, हे अत्यंत आक्षेपार्ह असून त्यांनी माफी मागितली पाहिजे, असे रिजिजू म्हणाले. या गदारोळामुळे सभागृहाचे कामकाज दोन वेळा स्थगित करावे लागले. एका १८ वर्षीय विद्यार्थिनीशी झालेल्या संवादाचा संदर्भ देत राहुल गांधी यांनी विद्यार्थी, सर्वज्ञानी समजणारे आणि अंधभक्त यांच्यातील फरक सभागृहात मांडला. विद्यार्थी नम्र असतो आणि सत्याची कास धरतो, तर दुसरी श्रेणी स्वतःला देव समजून खोटे बिंबवण्याचा प्रयत्न करते आणि तिसरी श्रेणी म्हणजेच अंधभक्त दुसऱ्या श्रेणीला देव मानू लागते, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले.

संसदेतील गदारोळात केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी विद्यार्थी आंदोलकांवरील पोलिस कारवाईचे समर्थन केले. काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या टीकेला उत्तर देताना त्यांनी आणीबाणीच्या काळातील स्वतःच्या अटकेची आठवण करून दिली. जेएनयूचे विद्यार्थी नेते घोष यांना अटक करण्यासाठी काही साध्या कपड्यातील पोलिस मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या मुख्यालयात गेले होते. त्यावरून विरोधकांनी सरकारवर टीकेची झोड उठवली. याबाबत नड्डा म्हणाले, हा एक कायदा आणि सुव्यवस्था राखण्याच्या प्रक्रियेतील सामान्य भाग आहे. मी स्वतः विद्यार्थी कार्यकर्ता होतो. काँग्रेसच्या राजवटीतील आणीबाणीच्या काळात मला वगार्तून अनेक वेळा अटक करण्यात आली होती. ते पुढे म्हणाले की, आंदोलन करणा-यांनी कायदा स्वतःच्या हाती घेतल्यास त्याचे परिणाम भोगण्याची तयारी ठेवली पाहिजे. ही सामान्य परिस्थिती आहे. कायदा व सुव्यवस्था स्वतःच्या हाती घेणाऱ्यांवर पोलिसांना कारवाई करावी लागते. संबंधित प्रकरणामध्ये पोलिसांनी त्यानुसार कारवाई केली आहे. नड्डा यांच्या वक्तव्यानंतर कॉक्रोच जनता पार्टीने केंद्र सरकारवर टीका केली. पक्षाचे प्रवक्ते आशुतोष रांका यांनी ह्यएक्सह्णवरील पोस्टमध्ये म्हटले की, गत ५० वर्षांत देशाने अजिबात प्रगती केली नाही, असे तुम्हाला म्हणायचे आहे का? सीजेपीने असा दावा केला की, सध्याच्या पोलिस कारवाईची तुलना आणीबाणीतील अटकेशी करणे म्हणजे गेल्या पाच दशकांत मतभेद आणि आंदोलन हाताळण्याच्या पद्धतीत कोणतीही सुधारणा झाली नसल्याची अप्रत्यक्ष कबुली देण्यासारखे आहे. विद्यार्थी हे दहशतवादी नसून या देशाचे भविष्य आहेत. सरकारने योग्य वर्तन केले नाही तर देशातील तरुण हे सरकार बदलून दाखवतील, असा इशारा सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी बुधवारी दिला. सरकारने विद्यार्थ्यांना त्रास देणे थांबवावे असेही ते म्हणाले. अनेक राज्यांत पोलिस विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांना अटकेच्या धमक्या देत आहेत असे सांगून दीपके म्हणाले, उद्या सरकार सुधारले नाही तर आम्ही सरकार बदलू असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. ते पुढे म्हणाले, पंतप्रधान मोदी यांनी राजीनामा देऊन इन्फल्युएन्सर बनावे, कारण ते काम ते खूप उत्तम प्रकारे करू शकतात, शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यामुळे विद्यार्थ्यांचा राग शांत झाला आहे, असा भ्रम सरकारने बाळगू नये.

# व्यावसायिक सचोटीचा सुवर्ण अध्याय: सुरक्षेसाठी १०० कोटींचा टॉवर स्वत: पाडला

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

रिअल इस्टेट क्षेत्र म्हटलं की ग्राहकांची फसवणूक, ताबा मिळण्यास होणारा उशीर, निकृष्ट दर्जाचे बांधकाम आणि बिल्डर-ग्राहक यांच्यातील कायदेशीर लढे हेच चित्र सामान्यतः डोळ्यांसमोर उभे राहते. नोएडातील 'ट्विन टॉवर्स' किंवा कोचीमधील 'मराडू कॉम्प्लेक्स' या बहुमजली इमारती न्यायालयाच्या आदेशानंतर प्रशासनाने पाडल्याचे संपूर्ण देशाने पाहिले आहे. मात्र, महाराष्ट्रातील ठाणे शहरात याच्या अगदी उलट, व्यावसायिक प्रामाणिकपणा आणि मानवी मूल्यांचे एक ऐतिहासिक उदाहरण समोर आले आहे. कोणत्याही न्यायालयाचा किंवा प्रशासनाचा कोणताही आदेश नसताना, एका बांधकाम व्यावसायिकाने, बिल्डरने केवळ ग्राहकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत, स्वतःचा १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खचार्चा १८ मजल्यांचा नवनवीन टॉवर जमीनदोस्त करण्याचा अभूतपूर्व निर्णय घेतला आहे.

ठाण्यातील पोखरण रोड क्रमांक २, गांधी नगर येथील हा प्रकल्प असून, रिअल इस्टेटच्या इतिहासात स्वतःचे इतके मोठे आर्थिक नुकसान सोसून इमारत पाडण्याची ही भारतातील पहिलीच वेळ आहे. त्यात राहणाऱ्या सर्व ४९ ग्राहकांचाही बिल्डरवर अभूतपूर्व विश्वास मिळवला.

**नेमकी घटना काय आणि तांत्रिक चूक कशी झाली?**

ठाण्यातील नामांकित विकासक आणि 'रीच प्रो कन्स्ट्रक्शन्स' या कंपनीचे संचालक अजित मराठे यांनी या परिसरात 'अमरा' नावाचा १८ मजल्यांचा एक आलिशान गृहप्रकल्प उभारला होता. या इमारतीमध्ये सर्व आधुनिक सुविधांसह एकूण ४९ सदनिका बांधण्यात आल्या होत्या. सर्व फ्लॅट्सची १०० टक्के विक्री झाली होती आणि अनेक कुटुंबांनी आपल्या आयुष्याची पुंजी या घरात गुंतवली होती. इमारतीचे संपूर्ण बांधकाम पूर्ण झाले होते आणि विकासक ग्राहकांना घरांच्या चाव्या सोपवण्याच्या तयारीत होते.

घरांचा ताबा देण्यापूर्वी इमारतीमध्ये लिफ्ट बसवण्याचे काम अंतिम टप्प्यात आले होते. हे काम सुरू असताना, लिफ्टच्या तांत्रिक पथकाच्या आणि इंजिनिअर्सच्या एका गोष्टी लक्षात आली, ज्याने सर्वांचेच पाय जमिनीवरून सरकले. इमारतीला एका बाजूने अतिशय सूक्ष्म झुकती आली होती.

तांत्रिक तपासणीअंती स्पष्ट झाले की, इमारतीचा पाया अत्यंत मजबूत होता आणि तो आपल्या जागेवरून हलला नव्हता. परंतु, पायाच्या वरच्या मजल्यांचे बांधकाम करताना मोजमापात काही मिलिमीटरची अतिशय सूक्ष्म तांत्रिक चूक झाली होती. ही चूक वरकरणी डोळ्यांना दिसणारी नव्हती आणि त्यामुळे इमारत तात्काळ कोसळण्याचा कोणताही धोका नव्हता. अगदी काही तज्ज्ञांच्या मते, हा दोष किरकोळ डागडुजी करून लपवता येण्यासारखा होता आणि पुढील काही दशके इमारत सहज उभी राहिली असती.

हा तांत्रिक दोष समोर आल्यानंतर बिल्डर अजित मराठे यांच्यासमोर दोन मार्ग होते. एकतर ती चूक कायदेशीर किंवा तांत्रिक पळवाटा शोधून लपवायची आणि ग्राहकांना घरांचा ताबा देऊन मोकळे व्हायचे; किंवा स्वतःहून चूक मान्य करायची. मराठे यांनी दुसरा, अत्यंत खडतर पण नैतिकतेचा मार्ग निवडला.

भविष्यात ५० किंवा १०० वर्षांनंतर या सूक्ष्म चुकीमुळे इमारतीला आणि तिथे राहणाऱ्या ४९ कुटुंबांच्या जिवाला कोणताही धोका निर्माण होऊ नये, तसेच आपल्या व्यावसायिक नावावर कधीही फसवणुकीचा डाग लागू नये, यासाठी त्यांनी संपूर्ण १८ मजल्यांची इमारत पाडून, ती पुन्हा शून्यापासून नव्याने बांधण्याचा धाडसी निर्णय घेतला. तब्बल १०० कोटी रुपयांहून अधिक किमतीचा प्रकल्प स्वतःच्या हाताने पाडणे याला रिअल इस्टेटच्या भाषेत आत्मघातकी पाऊल मानले जाते, पण मराठे यांनी त्याला 'नैतिकतेचे पाऊल' मानले.

**ग्राहकांची बैठक घेतली ग्राहकांनी अभूतपूर्व विश्वास दाखवून**

हा निर्णय घेतल्यानंतर अजित मराठे यांनी तातडीने सर्व ४९ फ्लॅट खरेदीदारांची एकत्र बैठक बोलावली. अनेकदा अशा बैठकांमध्ये गोंधळ आणि वाद होतात, मात्र इथे वेगळेच चित्र होते. बिल्डरने कोणत्याही प्रकारचा आडपडदा न ठेवता, अत्यंत पारदर्शकपणे तांत्रिक चुकीची माहिती ग्राहकांसमोर मांडली आणि स्वतःहून इमारत पाडत असल्याचे सांगितले.

ग्राहकांचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून त्यांनी बैठकीत दोन स्पष्ट पर्याय ठेवले की, पैसे वापसीः ज्या ग्राहकांना प्रकल्पामधून बाहेर पडायचे आहे, त्यांनी आपले दिलेले पैसे व्याजासह परत घ्यावेत.

भाडे आणि नवीन घरः जे ग्राहक थांबायला तयार आहेत, त्यांना इमारत पुन्हा नवीन बांधीपर्यंत विकासकातर्फे दरमहा चालू बाजारभावानुसार घरभाडे दिले जाईल, जेणेकरून त्यांना कुठेही राहताना आर्थिक फटका बसणार नाही.

विकासकाचा हा प्रामाणिकपणा आणि पारदर्शकता पाहून ग्राहक भारावून गेले. एकाही ग्राहकाने पैसे परत मागितले नाहीत किंवा बिल्डरविरुद्ध तक्रार केली नाही. सर्वच्या सर्व ४९ कुटुंबांनी बिल्डर अजित मराठे यांच्यावर पूर्ण विश्वास दर्शवत त्यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला.

**सध्याची स्थिती आणि बांधकाम क्षेत्रासाठी धडा**

सध्या विशेष आणि सुरक्षित तांत्रिक पद्धतींचा वापर करून हा १८ मजल्यांचा टॉवर टप्प्याटप्प्याने पाडण्याचे काम वेगाने पूर्ण केले जात आहे. हा संपूर्ण ढिगारा हटवल्यानंतर, याच जागेवर पुन्हा एकदा अत्यंत आधुनिक, सुरक्षित आणि उच्च दजार्ची नवीन इमारत उभारली जाणार आहे.

आजच्या काळात जिथे नफ्यासाठी आणि पैशांसाठी ग्राहकांच्या सुरक्षेशी तडजोड केली जाते, तिथे ठाण्यातील या घटनेने संपूर्ण देशातील बांधकाम क्षेत्रासमोर एक आदर्श घालून दिला आहे. "व्यवसायात नफा-तोटा होत राहतो, पण माणसांचा विश्वास आणि सुरक्षा एकदा गमावली की ती परत मिळवता येत नाही," हाच संदेश या घटनेतून मिळतो. या अभूतपूर्व निर्णयामुळे अजित मराठे आणि त्यांच्या कंपनीवर देशभरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

– ९५६१५९४३०६

# क्रिकेटच्या पटावरील 'पाच महारथी' आणि एका युगाचा अस्त!

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

भारतीय क्रिकेटचा इतिहास पाहिला, तर प्रत्येक दशकाने आपल्याला काही दैवी देणग्या दिल्या. ८० च्या दशकात कपिलदेव, ९० च्या दशकात सचिन-सौरव-द्रविड-लक्ष्मण यांची 'फॅब फोर' फळी, आणि त्यानंतर महेंद्रसिंग धोनीचा शांत-संयमी काळ. पण गेल्या एका दशकात भारतीय कसोटी संघाने ज्या पद्धतीने परदेशी भूमीवर – विशेषतः ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमध्ये – तिरंगा फडकावला, तो भारतीय क्रिकेटचा खरा 'सुवर्णकाळ' ठरला.

कसोटी क्रिकेटच्या अत्यंत खडतर मैदानात प्रतिस्पर्ध्यांच्या मैदानात डोळे घालून भिडणाऱ्या, पराभवाच्या जबड्यातून विजय हिसकावून आणणाऱ्या आणि भारताला जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या (डब्ल्यूटीसी) अंतिम फेरीत दोनदा पोहोचवणाऱ्या पाच योद्ध्यांचा हा काळ होता – विराट कोहली, रोहित शर्मा, चेतेश्वर पुजारा, अजिंक्य रहाणे आणि रविचंद्रन अश्विन!

आज काळ बदलला आहे. वय, फॉर्म आणि संघात नव्या रक्ताला स्थान देण्याची गरज या चक्रात हा सुवर्णकाळ आता हळूहळू अस्ताकडे झुकला आहे. पण या पाच योद्ध्यांनी भारतीय क्रिकेटच्या इतिहासाच्या पानांवर जे सुवर्णअक्षर कोरले आहे, ते कधीही पुसले जाणार नाही.

**१. विराट कोहली : आक्रमकतेचा विराट सम्राट**

विराट कोहली म्हणजे केवळ एक फलंदाज नव्हता, तर तो भारतीय संघात पेटलेला एक अंगार होता. कसोटी संघानं परदेशात जाऊन जिंकायचंच असतं, हा नवा दृष्टिकोन विराटने भारताला दिला. ऑस्ट्रेलियात ऑस्ट्रेलियाला नमवणारा पहिला भारतीय कर्णधार ठरण्यापासून ते कसोटी क्रिकेटमध्ये शतकांचा पाऊस पाडण्यापर्यंत, विराटने कसोटी फॉरमॅटला एक वेगळीच प्रतिष्ठा मिळवून दिली. त्याची कव्हर ड्राईव्ह जितकी नयनरम्य होती, तितकाच त्याचा मैदानावरील एग्रेसिव्ह अवतार प्रतिस्पर्ध्यांची झोप उडवणारा होता.

**२. चेतेश्वर पुजारा : आधुनिक युगाची 'द वॉल'**

आजच्या टी-२० आणि धडाकेबाज फलंदाजीच्या युगात चेतेश्वर पुजारा हा कसोटी क्रिकेटचा खरा साधू होता. शरीरावर चेंडूंचे असंख्य फटके झेलूनही एकाग्रता न गमावता तासनतास क्रीजवर उभे राहणे ही त्याची खासियत. २०१८-१९ च्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात त्याने एकामागून एक शतके ठोकत ऑस्ट्रेलियाचा अहंकार मोडून काढला होता. पुजारा बाद झाल्याशिवाय भारताचा पराभव होऊ शकत नाही, हा विश्वास त्याने तमाम भारतीयांच्या मनात निर्माण केला.

**३. अजिंक्य रहाणे : शांत, संयमी आणि 'गाबा'चा नायक**

मराठमोळा अजिंक्य रहाणे म्हणजे शांत स्वभावात दडलेला एक महाभयंकर लढाऊ योद्धा! संघाला जेव्हा जेव्हा गरज भासली, तेव्हा अजिंक्य धावून आला. लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर ठोकलेले शतक असो किंवा २०२०-२१ च्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात नियमित कर्णधार नसताना, संघात खेळाडूंची दुखापत झाली असताना गाबाचे मैदान जिंकून इतिहास घडवणे असो– अजिंक्यचे नेतृत्व आणि त्याची फलंदाजी ही भारतीय क्रिकेटची अमूल्य ठेव आहे.

**४. रोहित शर्मा : हिटमॅनचा लाल चेंडूवरील राजेशाही थाट**

मर्यादित षटकांचा बादशाह म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रोहित शर्माने जेव्हा कसोटीत सलामीची धुरा सांभाळली, तेव्हा कसोटी फलंदाजीची व्याख्याच बदलली. लाल चेंडूच्या स्विंगला सामोरे जात त्याने ज्या सहजतेने पुल आणि हूकचे फटके मारले, ते थक्क करणारे होते. इंग्लंडच्या कठीण परिस्थितीत ओव्हलवर ठोकलेले शतक असो किंवा कर्णधार म्हणून संघाला दिलेले स्थैर्य असो; रोहितने आपल्या फलंदाजीने आणि नेतृत्वाने कसोटी क्रिकेटमध्ये स्वतःचा वेगळा ठसा उमटवला.

**५. रविचंद्रन अश्विन : फिरकीचा जादूगार आणि चतुर बुद्धिमत्ता**

फलंदाजांना आपल्या तालावर नाचवणारा आणि बुद्धिबळाच्या खेळाडूप्रमाणे फलंदाजाला जाळ्यात अडकवणारा जादूगार म्हणजे रविचंद्रन अश्विन! कसोटीत ५०० पेक्षा जास्त बळी घेणारा हा फिरकीपटू केवळ गोलंदाज नव्हता, तर तो एक अष्टपैलू योद्धा होता. संकटसमयी त्याने बॅटनेही अनेकदा चमत्कार घडवले. सिडनी कसोटीत दुखापतग्रस्त असताना पुजारा आणि विहारीसोबत अश्विनने दिलेला लढा कसोटी इतिहासातील सर्वात शौर्यपूर्ण लढ्यांपैकी एक मानला जातो.

**एका युगाचा शेवट, नव्या पर्वाची नांदी**

काळ कोणासाठी थांबत नाही. खेळाडू येतात, इतिहास घडवतात आणि निवृत्त होतात किंवा संघाबाहेर जातात. आज भारतीय संघात यशस्वी जयस्वाल, शुभमन गिल, ऋषभ पंत यांसारखी तरुण पिढी धुरा सांभाळण्यासाठी सज्ज झाली आहे. परंतु, ऑस्ट्रेलियात जावून कांगारूंची घमेंड मोडणारा, इंग्लंडच्या दमट हवामानात आणि पेस-बाउन्ससमोर छाती ठोकून उभा राहणारा हा पाच योद्ध्यांचा गट जेव्हा पूर्णपणे मैदानाबाहेर होईल, तेव्हा प्रत्येक चाहत्याच्या डोळ्यात एक हळवी कोपरा नक्कीच असेल. विराटची ती आक्रमकता, पुजाराची ती चिकाटी, अजिंक्यचा तो संयम, रोहितचा तो क्लास आणि अश्विनची ती फिरकी... हे पाच स्तंभ भारतीय कसोटी क्रिकेटचा 'सुवर्णकाळ' म्हणून सदैव लक्षात राहतील! या पाचही महायोद्ध्यांच्या अलौकिक योगदानाला आणि खेळाडूवृत्तीला भारतीय क्रीडारसिकांचा कडकडून सलाम !

– ९०९६३७२०८२

# भारतीय शिक्षणपद्धती आणि वाढती बेरोजगारी चिंताजनक

**सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ**

भारतात शिक्षण हा यशाचा सर्वात मोठा मार्ग मानला जातो. परंतु इतर देशात विद्यार्थ्यांची आवड विचारात घेऊन त्यांच्या आवडीनुसार शिक्षण दिल्या जाते. त्यामुळे इतर देशांनी केवळ शिक्षणाच्या बळावर आपला सर्वांगीन विकास साधला आहे. परंतु आपल्या देशातील शिक्षणपद्धती ही सक्तीची आहे. ज्यामुळे शिक्षण विभागाने ठरविलेले विषय हे विद्यार्थ्यांना घ्यावेच लागते. मग त्या विषयात रस असो किंवा नसो. यामुळे त्यांच्यातील सुप्त गुणांचा ऱ्हास होतो. शिक्षण आणि बेरोजगारीचा संबंध हा एक गुंतागुंतीचा मुद्दा आहे जो कोणत्याही देशाच्या सामाजिक आणि आर्थिक रचनेवर परिणाम करतो.

एका बाजूला शिक्षणाला चांगल्या रोजगाराच्या संधींचे प्रवेशद्वार मानले जाते, तर दुसऱ्या बाजूला सुशिक्षित तरुणांमधील वाढती बेरोजगारी ही एक गंभीर चिंतेची बाब बनत चालली आहे.

अलीकडच्या वर्षांत भारत आणि जगाच्या अनेक भागांमध्ये सुशिक्षित बेरोजगारी एक मोठे आवाहन म्हणून उदयास आली आहे. याचा अर्थ असा की, उच्च शिक्षण घेऊनही मोठ्या संख्येने तरुण नोकरी शोधण्यात असमर्थ आहेत. ही परिस्थिती केवळ वैयक्तिक निराशेचे कारण बनत नाही, तर राष्ट्रीय विकासातही अडथळा आणते. बेरोजगारीची अनेक कारणे असली तरीही विद्यापीठे अनेकदा बाजारात मागणी असलेली कौशल्ये शिकवत नाहीत. अनेक शिक्षण संस्थांमध्ये शिक्षणाचा दर्जा खालावलेला आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना पुरेसे ज्ञान आणि कौशल्ये मिळत नाहीत.

कौशल्य अंतराची समस्या आजचा बाजार वेगाने बदलत आहे आणि नवीन कौशल्यांची मागणी करत आहे. आपली शिक्षण प्रणाली अनेकदा या बदलत्या गरजांशी जुळवून घेत नाही. केवळ पदवी मिळवणे पुरेसे नाही; दर्जेदार शिक्षण महत्त्वाचे आहे. कमकुवत अभ्यासक्रम, अप्रशिक्षित शिक्षक आणि जुन्या शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक रोजगार बाजारासाठी तयार करत नाहीत. ही एक अशी समस्या आहे जी सुशिक्षित बेरोजगारीला आणखी वाढवते. भारत हा जगातील सर्वात मोठ्या तरुण लोकसंख्येपैकी एक आहे, ज्याला अनेकदा 'लोकसंख्याशास्त्रीय लाभांश' म्हणून गौरवले जाते. तरीही एक विरोधाभास आहे.

भारत दरवर्षी लाखो अभियंते, एमबीए आणि पदवीधर तयार करतो, पण बेरोजगारीचा दर मात्र कमी करू शकत नाही. शिक्षण आणि रोजगार यांच्यातील वाढत्या दरीमुळे एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. आपण आपल्या विद्यार्थ्यांना बाजारपेठेला आवश्यक असलेली कौशल्ये देत आहोत का?

आजची शिक्षणपद्धती आणि वाढती बेरोजगारी यांच्यात गंभीर विसंगती निर्माण झाली असून पदवीधर तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. पारंपारिक ज्ञान देणारी शिक्षणप्रणाली, प्रात्यक्षिक कौशल्यांचा अभाव आणि उद्योगांच्या बदलत्या गरजा या प्रमुख समस्या आहेत. प्रात्यक्षिक व कृतीशील शिक्षणाऐवजी केवळ पाठमोरे आणि पदवी मिळवण्यापुरते शिक्षण, कौशल्यांची तफावत, बाजारातील मागणीनुसार आवश्यक असणारे तांत्रिक व संवादात्मक कौशल्ये विद्यार्थ्यांकडे नसतात. ज्यामुळे पदवीधर तरुणांना सामावून घेणारे उद्योग व सेवा क्षेत्रातील नवीन संधी अपुऱ्या पडत आहेत.

एवढेच नव्हे तर गेल्या काही वर्षांत शिक्षणाचा खर्च झपाट्याने वाढत असताना उच्चशिक्षित तरुणांमध्ये बेरोजगारी ही चिंताजनक पातळीवर पोहोचली आहे. त्यामुळे लाखो रुपये खर्च करून पदवी किंवा व्यावसायिक शिक्षण पूर्ण करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना अपेक्षित नोकरी मिळत नसल्याचे चित्र समोर आले आहे. शिक्षणाचा वाढता खर्च, रोजगाराच्या मर्यादित संधी आणि कौशल्यांतील तफावत यामुळे विद्यार्थी आणि पालक दोघांवरही आर्थिक व मानसिक ताण वाढत असल्याचे विविध अहवाल आणि तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

आज केवळ शाळा किंवा महाविद्यालयाची फी भरून शिक्षण पूर्ण होत नाही. शिकवण्या, स्पर्धा परीक्षा कोचिंग, डिजिटल उपकरणे, इंटरनेट, वाहतूक, गणवेश, पुस्तके, प्रोजेक्ट, वसतिगृह आणि इतर उपक्रमांवरही मोठा खर्च करावा लागतो. अनेक मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी मुलांच्या शिक्षणाचा खर्च हा घर खरेदी किंवा इतर मोठ्या आर्थिक जबाबदाऱ्यांइतकाच महत्त्वाचा बनला आहे. परिणामी अनेक पालक आपली बचत मोडतात, कर्ज घेतात किंवा इतर गरजा पुढे ढकलून मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देतात.

उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असली तरी त्याच प्रमाणात दर्जेदार रोजगार निर्माण होत नसल्याचे अहवालातून स्पष्ट होत आहे. अनेक पदवीधर महिनोनमहिने नोकरीच्या शोधात असतात. काहींना त्यांच्या शिक्षणाशी संबंधित नसलेल्या क्षेत्रात कमी पगारावर काम स्वीकारावे लागते, तर काही जण स्पर्धा परीक्षा किंवा सरकारी नोकरीच्या तयारीत अनेक वर्षे घालवतात. यामुळे शिक्षण पूर्ण झाल्यानंतरही आर्थिक स्वावलंबन लांबणीवर पडत असल्याचे दिसून येते.

देशाचा एकूण बेरोजगारी दर तुलनेने नियंत्रित असला तरी तरुणांमधील बेरोजगारीचे प्रमाण अधिक आहे. विशेषतः १८ ते २९ वर्षे वयोगटातील युवक-युवतींना शिक्षण पूर्ण झाल्यानंतर योग्य रोजगार मिळवण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. रोजगार, शिक्षण किंवा कौशल्य प्रशिक्षण या तिन्हींपासून दूर राहणाऱ्या तरुणांची संख्याही चिंतेचा विषय ठरत आहे. ही परिस्थिती देशाच्या लोकसंख्यात्मक लाभालाही आवाहन ठरू शकते हे नाकारता येत नाही.

उद्योगांना आवश्यक असलेली कौशल्ये आणि शिक्षण संस्थांमधून मिळणारे प्रशिक्षण यामध्ये अनेकदा मोठी दरी दिसून येते. अनेक कंपन्या उमेदवारांकडे पदवी असली तरी व्यावहारिक कौशल्ये, संवाद क्षमता, डिजिटल ज्ञान किंवा उद्योगानुसार आवश्यक अनुभव नसल्याची तक्रार पुढे करतात. त्यामुळे पदवीधरांची संख्या वाढली असली तरी रोजगारक्षम उमेदवारांचे प्रमाण अपेक्षेइतके वाढलेले नाही. कौशल्याधारित शिक्षण, इंटर्नशिप आणि उद्योग-संस्थांमधील समन्वय वाढवण्याची गरज आज निर्माण झाली आहे. या गरजेकडे वेळीच लक्ष दिले नाही, तर वाढती बेरोजगारी उग्र रुप धारण करेल हे निश्चित आहे.

शिक्षणासाठी घेतलेले कर्ज, वाढत्या फी आणि नोकरीबाबतची अनिश्चितता यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक दबाव वाढत आहे. दुसरीकडे, विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा, अपेक्षा आणि करिअरची चिंता वाढल्याने मानसिक ताणही मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. शिक्षणावर केलेली मोठी गुंतवणूक अपेक्षित परिणाम देत नसल्यास निराशा वाढू शकते. त्यामुळे शिक्षणासोबत करिअर मार्गदर्शन, कौशल्य विकास आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम यांवर भर देण्याची आवश्यकता अधोरेखित होत आहे.

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# जिल्ह्यातील कोणताही पात्र शेतकरी कर्जमुक्ती योजनेपासून वंचित राहणार नाही!

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, योजनेतील लाभासाठी आधार प्रमाणीकरण आवश्यक

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतून कोणताही पात्र लाभार्थी शेतकरी वंचित राहू नये याची पुरेपुर काळजी जिल्हा प्रशासन घेत आहे. गावपातळीवरील कृषी सहाय्यक, कृषी अधिकारी, तलाठी, तालुकास्तरीय समितीपासून जिल्हा पातळीवरील वरिष्ठांपर्यंत जबाबदारी निश्चित करण्यात आली असून जिल्ह्यातील २४ हजार ३२२ पात्र शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ पोहोचवू, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

जिल्ह्यातील या योजनेबाबत सद्यपरिस्थिती माध्यमांच्या निदर्शनास यावी व शेतकऱ्यांपर्यंत या योजनेबाबत जिल्हा प्रशासनाची माहिती पोहोचावी या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अजय कडू उपस्थित होते.

२४ हजार ३२२ शेतकऱ्यांची यादी सद्यस्थितीत आलेली असली तरी बँक पातळीवर आणखी पडताळणी सुरू आहे. यात कोणताही पात्र शेतकरी सुटू नये अशी शासनाची भूमिका आहे. शेतकऱ्यांना बँकांद्वारे संदेश दिला जाणार आहे. याचबरोबर कृषी सहाय्यकामार्फतही खातरजमा करून पात्र शेतकऱ्यांना एक क्रमांक दिला जाईल. व्हॉट्सअप ग्रुपद्वारे शासकीय यंत्रणा समन्वयात असून शेतकऱ्यांसाठीही हा संदेश मोबाईलवर पाठविला जाईल. यात जो क्रमांक असेल, आधार कार्ड, अॅग्रीस्टॅक आयडी, बँक पासबुक हे सोबत घेऊन शेतक-यांनी आपले सेवा केंद्रांवर जावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले. या केंद्रचालकांना सर्व प्रकारचे आवश्यक ते प्रशिक्षण दिले असून त्यांच्याकडून कोणतीही अडचण अथवा पैशाची मागणी केली जाणार नाही. एकही रुपया कोणत्याही शेतकऱ्यांकडून घेऊ नये, असे जिल्हा प्रशासनाच्या वतीने केंद्रचालकांना स्पष्ट कळविण्यात आले आहेत, असे त्यांनी सांगितले.

जे केंद्रचालक शेतकऱ्यांना पात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत ऑनलाईन प्रक्रियेसाठी पैशाची मागणी करतील अशा केंद्रचालकांविरुद्ध गुन्हा दाखल केला जाईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. बँकांकडून जशी पडताळणी होत आहे तशी यादी दिली जात आहे. ही पहिली यादी आहे. यात जर नाव नसतील तर शेतकऱ्यांनी पॅनिक न होता दुसऱ्या किंवा तिसऱ्या यादीची प्रतीक्षा करावी, असे त्यांनी सांगितले. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप अॅग्रीस्टॅक आयडी काढला नाही त्यांनी तो तत्काळ काढून घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.



**नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत विशेष प्रोत्साहनपर लाभ**

योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना मुदल व व्याजासह प्रति शेतकरी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्ती, तर नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत विशेष प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी तसेच नव्याने पीक कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' जाहीर केली आहे. ही योजना २ जून २०२६ च्या शासन निर्णयानुसार लागू करण्यात आली असून १५ जुलै २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार तिच्या निकषांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

**बोटांचे ठसे उमटत नसल्यास त्याबाबत तहसीलदारांकडे ऑनलाईन तक्रार करता येणार**

योजनेअंतर्गत थकबाकीदार पात्र शेतकऱ्यांची यादी २४ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून नागपूर जिल्ह्यातील २४ हजार ३२२ पात्र शेतकऱ्यांची नावे त्यामध्ये समाविष्ट आहेत. ही यादी गाव चावडी, ग्रामपंचायत कार्यालय, विविध कार्यकारी सेवा संस्था आणि संबंधित बँक शाखांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे. यादीतील शेतकऱ्यांनी आपला विशिष्ट क्रमांक, आधार कार्ड आणि बँकेचे पासबुक घेऊन जवळच्या सरकार सेवा केंद्रात किंवा संबंधित बँक शाखेत जाऊन आधार प्रमाणीकरण करून घ्यावे. या प्रक्रियेसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

आधार क्रमांक, बँक खाते क्रमांक अथवा कर्जाच्या रकमेबाबत काही त्रुटी असल्यास त्याची माहिती सरकार सेवा केंद्र चालकास द्यावी. बोटांचे ठसे उमटत नसल्यास त्याबाबत तहसीलदारांकडे ऑनलाइन तक्रार करता येणार असून सरकार सेवा केंद्र चालकांनी शेतकऱ्यांकडून कोणतेही शुल्क घेऊ नये, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

**शेतकऱ्यांना आक्षेप असल्यास पोर्टलवर तक्रार नोंदविता येणार**

गावपातळीवरील प्रसिद्ध यादीतील थकबाकीची रक्कम आणि योजनेच्या पोर्टलवरील रक्कम यात फरक असल्यास पोर्टलवरील रक्कम ग्राह्य धरली जाईल. पोर्टलवर दर्शविण्यात आलेली थकबाकीची रक्कम ३१ मार्च २०२६ रोजीची आहे. आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर त्याची पावती मिळेल. या पावतीमध्ये कर्जमुक्तीच्या लाभाची माहिती उपलब्ध असेल. त्यानंतर पात्र लाभाची रक्कम डीबीटीद्वारे संबंधित कर्ज खात्यात जमा केली जाईल. कर्जमुक्तीनंतर शेतकऱ्यांना कर्जबेबाकी प्रमाणपत्र दिले जाईल. तसेच सर्व पात्र लाभार्थ्यांना संबंधित बँकांमार्फत खरीप पीक कर्जाची उपलब्धता करून देण्यात येणार आहे. योजनेच्या पोर्टलवरील रक्कम किंवा कजार्संबंधी इतर कोणत्याही बाबीबाबत शेतकऱ्यांना आक्षेप असल्यास पोर्टलवर तक्रार नोंदविता येणार आहे. या तक्रारींचे निराकरण जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीमार्फत करण्यात येईल.

योजनेचा लाभ अॅग्रीस्टॅक प्लॅटफॉर्मवरील नोंदणी आणि आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतरच लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात हस्तांतरित करण्यात येणार आहे. त्यामुळे बँकांनी पात्र शेतकऱ्यांचा आधार क्रमांक अद्ययावत करून योजनेच्या पोर्टलवर अचूक माहिती अपलोड करावी आणि शेतकऱ्यांनीही आधार प्रमाणीकरण वेळेत पूर्ण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आणि जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अजय कडू यांनी केले आहे.

## राज्यपालांच्या हस्ते वृक्षारोपण महाअभियानाचा शनिवारी भव्य शुभारंभ

### मुख्यमंत्री फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत लोकभवन मध्ये मुख्य समारंभ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास, जिल्हा प्रशासन, नागपूर जिल्हा परिषद, वन विभाग व ग्रीन फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने नागपूर शहरासह जिल्ह्यात एकूण १० लाखांचे वृक्षारोपण महाअभियानाचा शुभारंभ महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या शुभहस्ते येत्या १ ऑगस्ट रोजी लोकभवनात दुपारी साडेबारा वाजता होणार आहे. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय परिवहन, राष्ट्रीय राजमार्ग मंत्री नितीन गडकरी, राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व महापौर निता ठाकरे उपस्थित राहणार आहेत.



सदर भागातील लोकभवनात दुपारी साडेबारा वाजता होणाऱ्या या समारंभाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, पर्यावरण व वातावरणीय बदल पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, अर्थ व नियोजन राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांच्यासह खासदार माया इवनाते, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार अभिजीत वंजारी, आमदार सुधाकर आडबाले, आमदार परिणय फुके, आमदार कृपाल तुमाने, आमदार संजय भेंडे, आमदार राजीव पोद्दार, आमदार डॉ. नितीन राऊत, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, आमदार विकास ठाकरे, आमदार मोहन मते, आमदार समीर मेघे, आमदार चरणसिंग ठाकूर, आमदार डॉ. आशीष देशमुख, आमदार संजय मेश्राम, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, प्रधान मुख्य वनसंरक्षक एम. श्रीनिवास राव यांच्यासह अधिकारी उपस्थित राहणार आहे.

# मटण मार्केटवर हात झटकले; पण निकृष्ट चौपदरी रस्त्याच्या चौकशीचे आश्वासन!

### 'हा नगरपंचायतीचा विषय' म्हणत आमदारांचा हस्तक्षेपास नकार; भेगा पडलेल्या रस्त्यावर संताप, अधिकाऱ्यांची बैठक घेणार

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

शहरातील मटण-मच्छी मार्केटच्या वादग्रस्त स्थलांतराच्या प्रश्नावर अखेर आमदार संजय मेश्राम यांनी स्पष्ट भूमिका घेत "हा नगरपंचायतीचा अंतर्गत विषय असून त्यात आमदार म्हणून हस्तक्षेप करणे योग्य नाही," असे सांगत या वादापासून हात झटकले. मात्र, दुसरीकडे कोट्यवधींच्या चौपदरी रस्त्याच्या निकृष्ट कामावर संताप व्यक्त करत संपूर्ण कामाची चौकशी करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.



नगरपंचायत कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत नगरसेविका किरण नागरिकर यांनी मटण मार्केट स्थलांतराचा मुद्दा उपस्थित केला. शहरातील नागरिक गेल्या अनेक वर्षांपासून मटण-मच्छी मार्केट रहिवासी भागातून हलविण्याची मागणी करत आहेत. प्रशासनाने पर्यायी जागांचाही शोध घेतला, तीन-चार ठिकाणांची पाहणी झाली; मात्र नगरसेवकांमधील मतभेदांमुळे निर्णय अजूनही धुळखात पडला आहे. परिणामी नागरिकांचा प्रश्न तसाच कायम असून नगरपंचायत आता यावर नेमका काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, सभेत शहरातून जाणाऱ्या २.४ किलोमीटरच्या चौपदरी महामार्गाच्या कामाचा दर्जाही चांगलाच धारेवर धरला गेला. नुकताच पूर्ण झालेल्या रस्त्यावर अल्पावधीतच भेगा पडल्याच्या तक्रारी, काही ठिकाणी अपुरी रुंदी, अपूर्ण नाले आणि निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत उपस्थितांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. कोट्यवधींचा निधी खर्चून उभारलेला रस्ता एवढ्या कमी कालावधीतच उखडू लागल्याने कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

यावर आमदार संजय मेश्राम यांनी महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांची स्वतंत्र बैठक बोलावून संपूर्ण कामाची चौकशी केली जाईल, दोषींवर कारवाईसाठी पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन दिले. आता या आश्वासनानंतर चौकशी प्रत्यक्षात होते की तीही कागदोपत्रीच राहते, याकडे भिवापूरकरांचे लक्ष लागले आहे.

बैठकीला नगराध्यक्षा सुषमा श्रीरामे, उपाध्यक्ष रुचीत पंजलवार, मुख्याधिकारी दीपिका गायकवाड, सभापती पिंटू श्रीरामे, मिथिला तिडके, रुचिता खापरीकर, साहिल टेम्भूर्णे यांच्यासह नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. बैठकीत डीपीडीसी विकासकामे, नगरविकास आराखडा, पाणीपुरवठा, घरकुल अनुदान, दलित वस्ती विकास योजना आणि घरकुलासाठी मोफत वाळू उपलब्धतेसह विविध विषयांचा आढावा घेण्यात आला.

# सुधीरभाऊ मुनगंटीवार फॅन्स क्लबतर्फे मेरोथॉनचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

बल्लारपूर विधानसभेचे विद्यमान आमदार सुधीर भाऊ मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त बल्लारपूर शहरात भव्य विदर्भस्तरीय मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेत विदर्भातील विविध जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने खेळाडूंनी सहभाग नोंदवला. मुसळधार पाऊस सुरू असतानाही खेळाडूंचा उत्साह अविस्मरणीय होता आणि त्यांनी जिद्दीने स्पर्धा पूर्ण करून क्रीडाभावनेचे उत्कृष्ट दर्शन घडवले.



**स्पर्धेतील सहभाग पुढीलप्रमाणे होता**

पुरुष खुला गट - ३५० खेळाडू, महिला खुला गट - २८० महिला स्पर्धक,
१० वर्षांवरील ते १८ वर्षांखालील मुला-मुलींचा गट - ३०० स्पर्धक,
सीनियर सिटीजन गट - ५० स्पर्धक,
अशा प्रकारे एकूण सुमारे ९८० स्पर्धकांनी या विदर्भस्तरीय मॅरेथॉन स्पर्धेत सहभाग नोंदवून कार्यक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद दिला.

**पुरुष ओपन गटाचे विजेते:**
प्रथम - राजेश यादव
द्वितीय - शुभम तिवारी
तृतीय - संतोष कुमार

महिला ओपन गटाचे विजेते:
प्रथम - मिताली भोयर
द्वितीय - प्रणाली शेडकेवार, तृतीय - रुक्मिणी

१६ वर्षांवरील मुलांचा गट:
प्रथम - निखिल अजिंक्यवार
द्वितीय - ओम निलमिले
तृतीय - पियुष पटले

१६ वर्षांवरील मुलींचा गट :
प्रथम - रुचिता नागरकर,
द्वितीय - अनन्या नागरकर
तृतीय - रुक्मिणी सलामे

३० वर्षांवरील पुरुष गट:
प्रथम - अमोल चाचणी
द्वितीय - उमेश डोंगरे
तृतीय - नितीन लोनगाडगे

३० वर्षांवरील महिला गट
प्रथम - पल्लवी मेश्राम
द्वितीय - शुभांगी राऊत
तृतीय - अखिल फटिंग

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून वरिष्ठ पत्रकार समीर केने, माजी नगरसेवक अरुण वाघमारे, वरिष्ठ पत्रकार नारद प्रसाद, वरिष्ठ पत्रकार शंकर महाकाली, अविनाश टोंगे, योगेश मडावी आणि सुनील दंडे उपस्थित होते.

संपूर्ण मॅरेथॉन स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन सुनील यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. तसेच सुधीर भाऊ मुनगंटीवार फॅन्स क्लबच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मुसळधार पावसाची पर्वा न करता अथक परिश्रम घेत कार्यक्रम यशस्वी करून दाखवला.

ही विदर्भस्तरीय मॅरेथॉन स्पर्धा केवळ क्रीडा स्पर्धा न राहता युवकांना आरोग्य, शिस्त आणि क्रीडासंस्कृतीचा संदेश देणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला.

**थोडक्यात**

## शिवसेना ओबीसी विभागाच्या पूर्व विदर्भातील लोकसभा संघटकांची नियुक्ती जाहीर

### पूर्व विदर्भात शिवसेनेची ताकत वाढणार: प्रवीण कळंबे

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शिवसेना ओबीसी विभागाच्या पूर्व विदभार्तील विविध लोकसभा मतदारसंघांसाठी संघटक पदांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. या नियुक्त्या हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना अभिप्रेत ठेवून तसेच शिवसेना प्रमुख नेते तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार करण्यात आल्याची माहिती शिवसेना ओबीसी विभागाचे पूर्व विदर्भ अध्यक्ष प्रवीण डी. कळंबे यांनी दिली आहे. पक्ष सक्षम करण्यासाठी आणि पूर्व विदर्भात ओबीसी विभागाचे कार्य प्रभावीपणे विस्तारण्याच्या उद्देशाने या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांवर संबंधित लोकसभा मतदारसंघात संघटन बळकट करणे, पक्षाच्या धोरणांचा प्रसार करणे, कार्यकर्त्यांशी समन्वय राखणे तसेच जनसंपर्क वाढविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. जाहीर करण्यात आलेल्या नियुक्त्यांमध्ये विलास डोंगे यांची चंद्रपूर लोकसभा संघटक, प्रभाकर तडस यांची वर्धा लोकसभा संघटक, नरेंद्र कंद्रीकरवार यांची गडचिरोली-चिमूर लोकसभा संघटक, तर अमोल तांडुळकर यांची रामटेक लोकसभा संघटक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे शिवसेना ओबीसी विभागाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले असून, पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी ते प्रभावीपणे कार्य करतील, असा विश्वास प्रवीण कळंबे यांनी व्यक्त केला आहे तसेच पूर्व विदभार्तील ओबीसी समाज आणि सर्वसामान्य जनतेचे प्रश्न शासनापर्यंत पोहोचवून पक्ष अधिक मजबूत करण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे. असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे माहीती दिली.

## आषाढी एकादशीनिमित्त एकात्मता उच्च प्राथमिक विद्यालयात उत्साहात दिंडी सोहळा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

एकात्मता नगर, जयताळा येथील एकात्मता उच्च प्राथमिक विद्यालयात आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून पारंपरिक दिंडी सोहळ्याचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले यावेळी विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून टाळ-मृदंगाच्या गजरात, विठ्ठल- रुक्मिणीच्या जयघोषात तसेच अभंग व भजनांच्या सादरीकरणातून आषाढी एकादशीचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व प्रभावीपणे उलगडून दाखविले. विद्यार्थ्यांच्या उत्साहपूर्ण सहभागामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी नियोजनबद्ध परिश्रम घेतले. त्यांच्या सहकार्यामुळे दिंडी सोहळा शिस्तबद्ध, आनंददायी आणि यशस्वीरीत्या पार पडला. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वारकरी परंपरा, संत संस्कृती, भक्तीभाव, सामाजिक ऐक्य तसेच भारतीय संस्कृतीतील मूल्यांची ओळख करून देण्यात आली. कार्यक्रमास उपस्थित पालक व नागरिकांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक करत शाळेच्या सांस्कृतिक उपक्रमांचे अभिनंदन केले.

## गुरुपौर्णिमेनिमित्त एच. एस. महात्मे संस्कार विहार शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

एच.एस. महात्मे संस्कार विहार शाळा, नागपूर येथे गुरुपौर्णिमेनिमित्त मंगळवारी २८ जुलै ला विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले होते. भारतीय संस्कृतीतील गुरू-शिष्य परंपरेचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थिनी कु. आर्या साठे हिने सुमधुर ईशस्तवनाने केली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी गुरूंच्या महत्त्वावर मनोगते व्यक्त करत गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त करणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.



कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन कु. दिशा बोर्डे यांनी तर दिपाली गुप्ता यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थ्यांनी गुरूंचे जीवनातील स्थान, संस्कारांचे महत्त्व आणि भारतीय परंपरेतील गुरू-शिष्य नात्याचे मूल्य प्रभावीपणे उलगडून सांगितले. सादर करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या संचालिका रजनीताई काळमेघ यांनी दिलेल्या मोलाच्या मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल सर्वांनी त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये गुरुजनांविषयी आदर, कृतज्ञता आणि भारतीय संस्कृतीतील गुरू-शिष्य परंपरे बद्दलची जाणीव अधिक दृढ झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## दक्षिण नागपूर मतदार संघात बीएलओ व बीएलऐ यांच्यासाठी १ व २ ऑगस्टला शिबीर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दक्षिण नागपूर मतदार संघाअंतर्गत शनिवार दिनांक १ ऑगस्ट रोजी तसेच रविवार २ ऑगस्ट रोजी सर्व मतदान केंद्र स्तरावर शाळा/ जवळचे समाजमंदिर अथवा सभागृह येथे बीएलओ आणि पक्षीय बीएलऐ यांचे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात वाटप करण्यात आलेले फॉर्म्स भरून जमा करण्यात येणार असून ज्या मतदारांचे पत्ते बीएलओ यांना आढळून आलेले नाहीत अशा अनुपस्थित/ मयत/ स्थलांतरित/ दुबार मतदारांच्या याद्या तयार करून घेऊन त्या सर्वपक्षीय बीएलऐकडून प्रमाणित करून घेण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. याकरीता सर्व राजकीय पक्ष प्रमुख यांची सभा घेण्यात आली असून त्यांचे नियुक्त बीएलऐ यांना शिबिरात उपस्थित राहून बीएलओंना सहकार्य करण्याबाबत तसेच मतदारांचे पत्ते शोधण्याबाबत मदत करण्याकरिता आवाहन करण्यात येत आहे.

# राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजनेची 'राज्यस्तरीय समिती' स्थापन

## शासकीय पड जमिनींवर चारा व बांबू उत्पादनाला वेग मिळणार, महिला बचत गटांना रोजगाराची संधी

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजनेअंतर्गत शासकीय पड जमिनी भाडेपट्ट्याने देऊन त्यावर चारा व बांबू लागवड करण्याच्या धोरणावर प्रभावी संनियंत्रण ठेवण्यासाठी महसूल मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय 'राज्यस्तरीय समिती' गठीत करण्यात आली आहे.



या समितीमध्ये ११ सदस्य या विधानसभा आणि विधानपरिषदेतील ११ महिला आमदार, तसेच प्रत्येक महसुली विभागातील दोन महिलांचा समावेश होणार असून महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव हे सदस्य सचिव म्हणून काम करणार आहेत. महसूल विभागाने याबाबतचा निर्णय घेतला असून यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय शुक्रवार ( दि. ३१ जुलै ) रोजी जारी करण्यात आला आहे.

शासकीय पड जमिनींचा योग्य वापर व्हावा आणि महिलांचे आर्थिक सक्षमीकरण व्हावे, यासाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत नोंदणीकृत पात्र महिला, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा महिलांचे बचत गट, उमेद/माविम अंतर्गत येणारे महिला बचत गट, महिला सेवा सहकारी संस्था तसेच ग्रामसंघ यांना शासकीय जमिनी भाडेपट्ट्याने देण्यात येणार आहेत. यामुळे महिलांना स्थानिक पातळीवर रोजगाराची उत्तम संधी उपलब्ध होणार आहे.

**राज्यस्तरीय समितीची रचना पुढीलप्रमाणे**

या संपूर्ण योजनेवर धोरणात्मक निर्णय घेणे व संनियंत्रण ठेवण्यासाठी ही राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

महसूलमंत्री- अध्यक्ष विधानसभा व विधानपरिषदेच्या ११ महिला सदस्य - सदस्य प्रत्येक महसूल विभागातील २ याप्रमाणे महसूल मंत्र्यांनी नामनिर्देशित केलेल्या
१२ अशासकीय महिला सदस्य - अशासकीय महिला सदस्य
अपर मुख्य सचिव (महसूल) - सदस्य सचिव

**समितीची प्रमुख कार्यकक्षा व जबाबदाऱ्या**

आढावा घेणे : या योजनेअंतर्गत जमिनी भाडेपट्ट्याने देण्याच्या कार्यवाहीचा दर ३ महिन्यांनी राज्यस्तरावर आढावा घेणे.

संनियंत्रण : जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत राबवल्या जाणाऱ्या जिल्हा व तालुकास्तरीय समित्यांच्या कामकाजावर लक्ष ठेवणे.

अडचणींचे निवारण : योजनेच्या अंमलबजावणीत येणाऱ्या प्रशासकीय व धोरणात्मक अडचणी सोडवणे.

धोरणात सुधारणा : चारा, बांबू, नर्सरी व अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या उत्पादनासाठी आवश्यकतेनुसार धोरणात सुधारणा सुचवणे.

---

## थोडक्यात

### अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त पीपल्स रिपब्लिकन पार्टीतर्फे भव्य रॅलीचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने शनिवारी १ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वाजता. भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली लक्ष्मीनगर चौक येथून प्रारंभ होऊन दीक्षाभूमी चौक येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यापर्यंत काढण्यात येणार आहे. या रॅलीचे नेतृत्व पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा प्राप्त) जयदीपभाई कवाडे करणार आहेत. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या समतावादी, परिवर्तनवादी आणि मानवतावादी विचारांना अभिवादन करण्याबरोबरच त्यांच्या कार्याचा व्यापक जागर करण्याच्या उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती पक्षातर्फे देण्यात आली.

रॅलीमध्ये पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला, युवक, सामाजिक कार्यकर्ते तसेच आंबेडकरी, परिवर्तनवादी आणि पुरोगामी विचारांचे नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. हे आवाहन पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे नागपूर शहराध्यक्ष कैलाश बोंबले, नागपूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष नरेंद्र डोंगरे, नागपूर जिल्हा महिला आघाडीच्या अध्यक्षा सविताताई नारनवरे, नागपूर जिल्हा युवक आघाडीचे अध्यक्ष पलाश ठावरे, प्रदेश संघटक कपिलजी लिंगायत, प्रदेश उपाध्यक्ष मृणाल गोस्वामी, दक्षिण- पश्चिम नागपूर विधानसभा अध्यक्ष स्वप्नील महल्ले, क्षयश गडलिंग तसेच पक्षाच्या इतर पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### दिल्लीतील एनटीपीसी भवनात महत्त्वपूर्ण बैठक

**कंत्राटी कामगार, कुंभारी पुनर्वसन आणि प्रकल्पग्रस्तांच्या रोजगारावर सकारात्मक चर्चा**



**दै. सिंहवाणी वृत्त, नवी दिल्ली**

आज दिल्ली येथील एनटीपीसी भवनात खासदार श्यामकुमार बर्वे यांच्या नेतृत्वाखाली देवेंद्र गोडबोले माजी जि.प सदस्य यांच्या उपस्तीथी मधे एनटीपीसीचे सीएमडी गुरदीप सिंह यांची महत्त्वपूर्ण भेट घेण्यात आली. या बैठकीत एनटीपीसी कंत्राटी कामगारांच्या विविध मागण्या, कुंभारी गावाचे पुनर्वसन तसेच प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी रोजगार देण्याच्या मुद्द्यांवर सविस्तर आणि सकारात्मक चर्चा झाली. बैठकीदरम्यान एनटीपीसी कंत्राटी कामगारांच्या प्रलंबित मागण्यांचे निवेदन सीएमडी गुरदीप सिंह यांना सादर करण्यात आले. कामगारांच्या वेतनवाढ, सामाजिक सुरक्षा आणि इतर हक्कांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती देण्यात आली.

तसेच, कुंभारी गावाच्या पुनर्वसनाच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात आली. गावकऱ्यांच्या समस्या, पुनर्वसनाची प्रक्रिया आणि आवश्यक सुविधांबाबत एनटीपीसी प्रशासनाशी विचारविनिमय करण्यात आला. याशिवाय, एनटीपीसी प्रकल्पामुळे प्रभावित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी नोकरी देण्याच्या मागणीवरही सकारात्मक चर्चा झाली. या विषयावर लवकरच योग्य निर्णय घेण्याबाबत आशादायक वातावरण असल्याचे सांगण्यात आले. खासदार श्यामकुमार बर्वे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या बैठकीमुळे एनटीपीसी कंत्राटी कामगार, कुंभारी गावातील नागरिक आणि प्रकल्पग्रस्तांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

### मंदीर चोरी तसेच गोडावुन फोडी करणाऱ्या आरोपीस अटक



**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

मौदा शहरातील दि. ३०/०७/२०२६ रोजीचे रात्री दरम्याण विठ्ठल रुख्मिनी मंदीरातील दानपेटी चोरी तसेच दि. २१/०७/२०२६ रोजीचे रात्री दरम्याण फ्लिपकार्ट गोडावुन चोरीचे गुन्हे पोस्टे मौदा येथे दाखल झाल्याने वाढत्या चोरीच्या गुन्ह्यांवर आळा झालने संबंधी श्री. सारीन दुर्गे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन मौदा यांनी गंभीरपणे दखल घेवुन मौदा येथील दोन्ही घरफोडी करणा-या आरोपीचा तात्काळ शोध घेवुन अटक करण्याबाबत डी.बी. पथकास आदेश दिल्याने डी. बी. पथकाने कसोशीने प्रयत्न करुन गुप्त माहितीचे आधारे आरोपी तुफान स्वरुपलाल लिल्हारे, वय २८ वर्षे, रा. झाडगाव, ता. वाराशिवनी, जि. बालाघाट (म.प्र.) यास निष्पन्न केले व आरोपीस त्याचे मुळ गाव झाडगाव, ता. वाराशिवनी, जि. बालाघाट (म.प्र.) येथुन ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने दोन्ही गुन्ह्याची कबुली दिल्याने आरोपीचे ताब्यातुन गुन्ह्यात वापरलेली इलेक्ट्रीक कटर मशीन तसेच नगदी ४,३३२/-रु. असा एकुण ६,३३२/-रु. चा माल हस्तगत करण्यात आलेला आहे.

सदर कारवाई हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक सा. ना.ग्रा., अनिल मस्के, अपर पोलीस अधिक्षक सा. ना.ग्रा., संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान, यांचे मार्गदर्शणात श्री. सारीन दुर्गे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे मौदा यांचे सोबत डि.बी. पथकातील सपोनि/राहुल किटे, पोलीस अमलदार संदीप कडु, गणेश मुदमाळी, रुपेश महादुले यांनी केली आहे.

---

# अधीक्षक अभियंता मनोज तालेवार सेवेतून निवृत्त

## मनपाच्या ३७ कर्मचाऱ्यांना दिला निरोप

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मनपाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या ३७ कर्मचार्यांचा निरोप समारंभ आज (ता. ३१) डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समितीच्या सभागृहात पार पडला. यावेळी सहाय्यक आयुक्त डॉ. सौरभ कावळे, शिक्षण अधिकारी वंदना महाजन व जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता मनोज सिंग, वैद्यकीय अधिकारी दिपंकर भिवगडे, उपअभियंता संजय इंगळे, मुख्याध्यापिका मरियमबी शमसुन्निसा हफीज कलह यांच्यासह मनपाच्या सेवेतील ३७ कर्मचारी सेवानिवृत्त झाले. त्या सर्वांचा मनोज तालेवार, वंदना महाजन, मनीष सोनी यांच्याहस्ते शाल, श्रीफळ, तुळशीचे रोपटे व सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



निरोप समारंभातील सत्काराला उत्तर देताना मनोज तालेवार यांनी मनपाच्या सेवेतील अनुभव कथन केले. मनपाच्या शाळेत शिक्षण घेतल्यापासून आपले मनपाशी संबंध जुळले आहेत. आता अधीक्षक अभियंता पदावरून निवृत्त आहे. या काळात विविध पदांवर काम करताना चांगले काम करता आले. संयम व प्रामाणिकपणा राहिला तर आयुष्यात अनेक कामे सोपे होते व मनपात काम करणेही सुकर होत असल्याचे त्यांनी सांगितले. आयुष्याच्या या टप्प्यावर सेवानिवृत्तांनी आपले उर्वरित आयुष्य चांगले घालवावे व त्यासाठी चांगले आरोग्य आपल्याला लाभावे, अशा शुभेच्छांही त्यांनी दिल्या.

यावेळी बोलताना जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी म्हणाले, आपण सर्वांनी आयुष्याचा मोठा काळ मनपामध्ये घालविला आहे. आता आयुष्याचा दुसरा डाव सुरू होणार आहे. या काळात जे आपल्याला करता आले नाही. ते आता नव्या डावात करता येईल. यासाठी त्यांनी सर्वांना निरामय आरोग्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

---

### समाज कल्याण विभागाचे महाडीबीटी प्रणालीवर अर्ज सादर करणेबाबत आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर विभागातील महाविद्यालयामध्ये सन २०२५-२६ व २०२६-२७ मध्ये प्रवेश घेतलेले व शिष्यवृत्तीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज तात्काळ https://mahadbt2.maha rashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करावेत. महाडिबीटी २.० या संकेतस्थळावर नवीन तसेच नूतनीकरणाचे शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची प्रक्रिया अधिकृतपणे सुरु करण्यात आली आहे. विभागातील सर्व शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित व कायम अनुदानित महाविद्यालयांमधील अनुसूचित जाती प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांनी या योजनेचा तातडीने लाभ घ्यावा असे आवाहन प्रसाद कुळकर्णी, प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण विभाग नागपूर यांनी केले आहे. इयत्ता ११ वी, १२ वी, व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या सर्व (नवीन व नूतनीकरण) विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम आधार क्रमांकाचा वापर करून पोर्टलवर आपली महाआयडी तयार करणे आवश्यक आहे. आधार कार्डवरील माहिती (नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक व ई-मेल) अद्यावत असणे आवश्यक आहे. दरम्यान, जात प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, अधिवास दाखले व शैक्षणिक कागदपत्रे स्पष्ट, पीडीएफ स्वरुपात संकलित करून ठेवावीत. शिष्यवृत्ती अर्ज भरणे हा प्रवेश प्रक्रियेचाच एक भाग आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरुन त्याची प्रत महाविद्यालयात जमा करावी. महाविद्यालयांनी प्रवेशाच्या वेळीच विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेऊन ते तातडीने समाज कल्याण कार्यालयाकडे फॉरवर्ड करावे.

---

# राज्य अन्न आयोगाने घेतला नागपूर जिल्ह्याचा विशेष आढावा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवल्या जाणाऱ्या अन्न धान्याची गुणवत्ता, त्याचे नियोजन आणि वितरण व्यवस्था अधिक पारदर्शक व सक्षम करण्याच्या उद्देशाने राज्य अन्न आयोगाने नागपूर जिल्ह्याचा विशेष आढावा घेतला. या दौऱ्यादरम्यान राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे आणि सदस्य ईश्वर बाळबुध्ये यांनी नागपूर जिल्ह्यास सदिच्छा भेट दिली. जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे आयोजित बैठकीत अन्न व नागरी पुरवठा योजनेचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यानंतर आयोगाच्या अध्यक्षांनी व सदस्यांनी प्रत्यक्ष लाभार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. तसेच अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शिधापत्रिकांचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा पुरवठा अधिकारी आनंद पडोळे आणि अन्नधान्य वितरण अधिकारी शालिनी गेडाम यांची प्रमुख उपस्थिती होती.

### पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिकेचे वितरण

बैठकीदरम्यान अध्यक्षांनी स्पष्ट केले की, अन्न सुरक्षा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे ही शासनाची प्राथमिकता असून प्रत्येक पात्र नागरिकाला वेळेवर व दर्जेदार धान्य मिळणे हा त्याचा हक्क आहे. प्रशासनाने या प्रक्रियेत अधिक सुलभता आणावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. तसेच पुरवठा विभागाशी संबंधित काही तक्रारी किंवा सूचना असल्यास, नागरिक त्या लेखी स्वरूपात जिल्हा पुरवठा अधिकारी व अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयाकडे सादर करू शकतात, असे त्यांनी सांगितले.

---

### नागपूर पश्चिम विधानसभा मतदारसंघात १ व २ ऑगस्टला विशेष एसआयआर शिबिरे

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत नागपूर पश्चिम विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रांवर दिनांक १ व २ ऑगस्ट रोजी (शनिवार व रविवार) रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरांमध्ये संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी मतदान केंद्रावर उपस्थित राहून इनुमेरेशन फार्म स्वीकारणे, त्यांची पडताळणी करणे, आवश्यक मार्गदर्शन करणे तसेच निवडणूक आयोगाने निर्धारित केलेले इतर कामकाज पार पाडणार आहेत. मतदारांनी भरलेला एऩ्म आवश्यक कागदपत्रांसह आपल्या संबंधित मतदान केंद्रावर जमा करावा. ज्या मतदारांनी अद्याप एऩ्मभरलेला नसेल त्यांनीही संबंधित बीएलओ यांच्याशी संपर्क साधून तो भरून द्यावा. मतदार यादी अद्ययावत, अचूक व त्रुटीरहित करण्यासाठी हा कार्यक्रम अत्यंत महत्त्वाचा असून नागपूर पश्चिम विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदारांनी या विशेष शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन उप जिल्हाधिकारी तथा ५६- नागपूर पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी विवेक साळुंके नागपूर यांनी केले आहे.

---

# मनपाच्या ५० गुणवंत स्वच्छता दुतांचा महापौरांच्या हस्ते सत्कार

## शहीद सफाई सैनिक दिनानिमित्त उत्कृष्ट काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना ५ हजार रुपये

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मनपाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे ३१ जुलै या शहीद सफाई सैनिक दिनानिमित्त शहरातील प्रत्येक झोनमधील उत्कृष्ट सेवा देणाऱ्या ५ सफाई कर्मचारी अशा १० झोनमधील एकूण ५० सफाई कामगारांचा सत्कार महापौर निता ठाकरे, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, गलिच्छ वस्ती निर्मूलन व घरबांधणी विशेष समितीच्या सभापती रुतिका मसराम, महिला व बाल कल्याण विशेष समितीच्या सभापती सारिका नांदूरकर, नगरसेवक मनोज साबळे, मनपाचे अतिरिक्त आयुक्त मुरुगनंथम एम. यांच्या हस्ते करण्यात आला.



डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समितीच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात शाल, श्रीफळ, तुळशीचे रोपटे व ५ हजार रुपये रोख असे या सत्काराचे स्वरुप होते. यावेळी मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांच्यासह प्रत्येक झोनचे स्वच्छता अधिकारी उपस्थित होते.

**सफाई कामगार शहर स्वच्छतेचा कणा- महापौर**

यावेळी बोलताना महापौर निता ठाकरे म्हणाल्या, सफाई कर्मचारी म्हणून उत्कृष्ट काम करणाऱ्या शहरातील ५० सफाई कर्मचाऱ्यांचा सत्कार हा त्यांच्या कामाची पावती आहे. हे तुमचे कार्य अभिनंदनीय आहे. तुमचे उत्कृष्ट काम हे इतरांसाठी प्रेरणा ठरणार आहे. शहर स्वच्छ ठेवण्यात सफाई कर्मचाऱ्यांची मोठी भूमिका आहे. शहराच्या स्वच्छतेचा हा एक प्रकारे कणा आहे. आपण इतरांना सुद्धा चांगले काम करण्यासाठी प्रेरित करावे व यातून नागपूर शहर स्वच्छतेच्या कसोटीवर सर्वोत्कृष्ट करण्यासाठी आपण कटिबद्ध राहावे, असे आवाहन महापौर निता ठाकरे यांनी यावेळी केले.

प्रारंभी महापौर निता ठाकरे, उपमहापौर लिला हाथीबेड, सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी दीप प्रज्वलन केले. मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांनी महापौर ठाकरे, उपमहापौर हाथीबेड, सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर यांचे तुळशीचे रोपटे देऊन स्वागत केले. प्रास्ताविक मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांनी केले. यावेळी त्यांनी हा दिवस दरवर्षी महानगरपालिकेत साजरा होत असल्याची माहिती दिली. उत्कृष्ट काम करण्याच्या निकषांवर गुणवंत सफाई कर्मचारी म्हणून निवड केल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन अरुण तुरके यांनी केले तर आभार प्रवीण तंत्रपाळे यांनी मानले.

